**तुमचं आमचं नातं काय? जय जिजाऊ जय शिवराय!**

**स्वराज्यजननी जिजाऊ माय,**
**स्वातंत्र्य समतेचा जयघोष शिवराय**
**अन्यायाशी कसं भिडायचं हाय,**
**सांगती आम्हां जिजाऊ शिवराय**
आता साऱ्यांना गर्जून हे सांगायचं हाय......
**तुमचं आमचं नातं काय?**
**जय जिजाऊ जय शिवराय!**

वतनदार किती लुटती रयतेला,
घोडं जाती तुडवीत उभ्या पिकाला
तवा रयतेला मायेने धरले पोटाशी,
जुल्मी वतनदारा गाडले मातीशी
अशा स्वराज्याचे बीज रुजवायचं हाय......
**तुमचं आमचं नातं काय?**
**जय जिजाऊ जय शिवराय!**

बाई गुलामीच्या कोंडीत होती
तिच्या अब्रूची लक्तरे तोडीत होती
अशा रांझ्याच्या पाटलाचा चौरंगा केला
न्यायाचा दिवा इथं त्यांनी लावला
अशी न्यायाची ज्योत पुन्हा पेटवायची हाय.....
**तुमचं आमचं नातं काय?**
**जय जिजाऊ जय शिवराय!**

जातीभेदाची भिंत फोडली
अंधश्रद्धेची बेडी तोडली
धर्माधर्माला त्यांनी प्रेमाने जोडले
माणुसकी ध्वजाला उंच फडकवले
आता भेदभाव इथला हा संपवायचा हाय....
**तुमचं आमचं नातं काय?**
**जय जिजाऊ जय शिवराय!**

## प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा

प्रश्न विचारा पुन्हा पुन्हा, असेच का अन् तसेच का?
शिकणे कधी संपत नाही, होऊ द्यात लाख चुका

कुत्र्याची शेपूट वाकडी का ?
पेंग्विनची मान तोकडी का ?
क्रिकेटची बॅट लाकडी का ?
सापाची चाल वाकडी का ? **प्रश्न विचारा....**

वटवाघळं रात्री फिरतात का ?
मासे पाण्यात तरतात का ?
पतंग दिव्यावर मरतात का ?
काजवे चमचम करतात का ? **प्रश्न विचारा....**

खोकल्याची उबळ येते का ?
सर्दीत नाक गळते का?
मेंदूला वास कळतो का?
आठवणीने उचकी लागते का ? **प्रश्न विचारा....**

रंगीत तारे असतात का ?
दिवसा तारे दिसतात का ?
जीवसृष्टी आणखी कुठे असेल का ?
माणसासारखा माणूस होईल का ? **प्रश्न विचारा....**

## धरतीची आम्ही लेकरं

**धरतीची आम्ही लेकरं । भाग्यवान ।**
**धरतीची आम्ही लेकरं ।।**

शेतावर जाऊया । सांगाती गाऊया ।
रानीवनी गाती जशी रानपाखरं ।।

मेहनत जिमनिवरी । केली वरीसभरी ।
आज आलं फळ त्याच डुले शिवार ।।

शाळु, जुंधळा मोती । चमचम चमकत्याती ।
मोत्यांची सालभरी खाऊ भाकर ।।

स्थापू समानता । पोलादी ऐक्यता ।
नाही धनी येथ कुणी, नाही चाकर ।।

- द . ना. गव्हाणकर